दैनिक बोल नाशिक

प्रत्येक बातमीचा निःपक्ष खुलासा

PRGI No. MHBIL/25/-2129

संपादक : मायकल खरात, मो.9359261192

रविवार, दि.१८ जानेवारी २०२६ | वर्ष : १ | अंक : ११६ | पाने : ४ | किंमत २ रुपये

# नाशिकच्या विजयानंतरही महाजनांनी बोलून दाखवली खंत

नाशिक

महापालिका निवडणुकीत १०० प्लसचा नारा देणाऱ्या भाजपला ७२ जागांपर्यंतच पल्ला गाठता आला. एकहाती सत्ता मिळाली, परंतु, एबी अर्ज पळवापळवीतील गोंधळाचा पक्षाला फटका बसला. सात ते आठ जागा गमवाव्या लागल्याची कबुली खुद्द कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. महत्वाचे म्हणजे या प्रकरणात एका माजी नगरसेविकेसह पदाधिकाऱ्यांवर कारवाई झाली. मात्र इतरांवर कारवाईच झालेली नसल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या १२२ पैकी भाजपने ७२ जागा जिंकून बहुमत मिळवले. एबी अर्ज वाटपात अखेरच्या टप्प्यातील गोंधळाने पक्षाची समीकरणे चुकली. एबी अर्ज लंपास होऊन इच्छुकांनी ते थेट उमेदवारी अर्जाबरोबर सादर केल्याने काही प्रभागात पक्षाचे दोन एबी अर्ज सादर झाले होते. यामध्ये ज्यांचा अर्ज आधी आला, त्यास अधिकृत उमेदवार म्हणून गणले गेले. यामुळे सिडकोतील पक्षाचे तीन जागांवर पुरस्कृत उमेदवार होते. यातील दोघांनी माघार घेऊन भाजप पुरस्कृत उमेदवारांना पाठिंबा दिला. परंतु, प्रभाग २६ मध्ये माजी नगरसेविका अलका अहिरे यांनी दाद न दिल्याने त्यांची हकालपट्टी करावी लागली. भाजपचे बहुचर्चित नेते, नगरसेवक सुधाकर बडगुजर यांचेही नाव एबी अर्जाच्या



गोंधळाशी जोडले गेले होते. परंतु, त्यांनी हे आक्षेप तथ्यहिन ठरवत पत्नी हर्षा बडगुजर यांची प्रभाग २५ मधील उमेदवारी मागे घेतली होती. ते प्रभाग २५ मधून तर मुलगा दीपक बडगुजर प्रभाग २९ मधून मैदानात उतरले. प्रभाग २९ मध्ये एबी अर्ज मिळालेले पण, उशिरा दाखल केल्याने भाजपचे उमेदवार ठरू न शकलेल्या मुकेश शहाणेंनी बंडखोरी करीत दीपक बडगुजर यांना मोठ्या फरकाने पराभूत केले.

शहाणे-बडगुजर वादात पक्षाचे नुकसान झाले. निवडणूक काळात भाजपने शहाणेंची हकालपट्टी केली. निकालातून एबी अर्ज गोंधळाचा प्रभाव समोर आला. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी त्यावर भाष्य केले.

सिडकोतीत काही प्रभागात गोंधळ झाला. मुकेश शहाणे, ढोमसे, ठाकरे यांचे तिकीट ठरलेले होते. यादी अंतिम झाली होती. काहींनी एबी अर्ज पळवून आपले नाव लिहिल्याने काही जागांवर पक्षाला उमेदवार पुरस्कृत करावे लागले. त्यांना कपाट, सिलिंडर, छत्री अशी वेगवेगळी चिन्हे मिळाल्याने गोंधळ झाला. कमळ चिन्ह असते तर भाजपच्या जागा वाढून ९० च्या जवळपास गेल्या असत्या, असे महाजन यांनी सूचित केले. एबी अर्जाच्या प्रकरणात स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले. नाशिक भाजपने या संदर्भातील अहवाल पाठविला. पक्षाने चौकशीसाठी दोघांची नेमणूक केली आहे. त्यामुळे नाशिकच्या निकालाने समाधानी असलो तरी पूर्ण समाधानी नाही, असे महाजन यांनी म्हटले आहे. भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांनीही भाजपचा १०० प्लसचा नारा पूर्ण झाला असता. पण शेवटच्या टप्प्यात एबी अर्ज वाटपातील गडबड गोंधळामुळे भाजपच्या काही अधिकृत उमेदवारांना कमळ हे चिन्ह मिळाले नाही.

पक्षाचे काही उमेदवार अगदी थोड्या मतांनी पराभूत झाल्याकडे लक्ष वेधले. एबी अर्ज घोटाळ्यात भाजपच्या पुरस्कृत पुष्पावती पवार, भाग्यश्री ढोमसे आणि प्रकाश अमृतकर हे पराभूत झाले. प्रभाग २९ मध्ये पक्षाने हातची जागा गमावली.

# कुंभमेळ्यापूर्वी शिर्डीतील विकासकामे पूर्ण करण्याचे विभागीय आयुक्तांचे आदेश

अहिल्यानगर प्रतिनिधी

नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी सुरू असलेली विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण करा. शिर्डी विमानतळ विस्तारीकरण व रस्त्यांच्या कामांचा वेग वाढवून ती कुंभमेळ्यापूर्वीच पूर्ण करावीत तसेच, गर्दीचे नियोजन करताना प्रशासकीय सोयीपेक्षा भाविकांच्या सोयी- सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्या, नगर-मनमाड महामार्गाचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावे, अशा सूचना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा नाशिक विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांनी दिल्या. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने शिर्डी-शिंगणापूर येथील भाविकांच्या गर्दी नियोजनाबाबत शिर्डीत आयोजित आढावा बैठकीत डॉ. गेडाम बोलत होते. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, शिर्डीचे पोलिस उपाधिक्षक अमोल भारती, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर



यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. गेडाम यांनी सांगितले की, शिर्डी विमानतळ विस्तारीकरणाच्या कामांचा वेग वाढविण्यात येऊन पुढील सहा महिन्यांच्या आत कामे पूर्ण करावीत. रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी कोपरगाव पॅटर्न राबवावा. शिर्डी हे टर्मिनस असल्याने गाड्या वळवण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांना कोपरगावला थांबा देऊन तिथून बसेसद्वारे भाविकांना शिर्डीत आणण्याचे नियोजन करावे. शिर्डी-राहाता बाह्यवळण रस्ता कामाबाबत अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. आपण स्वतः या कामाची व साहित्याची पाहणी करणार असून, त्रुटी आढळल्यास काम पुन्हा करण्यास सांगितले जाईल. नाशिकमधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी व भाविकांचा वेळ वाचवण्यासाठी शिर्डी ते त्र्यंबकेश्वर थेट बससेवा सुरू करावी. तसेच, जड वाहनांमुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी मनमाडकडून येणारी वाहने येवला - वैजापूर - गंगापूर - नेवासा - अहिल्यानगर या मार्गाने वळवावीत अशा सूचना गेडाम यांनी यावेळी केल्या. एसटी महामंडळाने पर्वणी काळात दररोज ६८० फेऱ्यांचे नियोजन केल्याचे सांगितले. वाहनतळवरील कचरा उचलण्यासाठी घंटागाड्यांऐवजी ट्रॅक्टरचा वापर करा, स्वच्छतेसाठी ५०० अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरऐवजी पाईपलाईनवर भर द्यावा, यासाठी निळवंडे कालव्यावरून पाणी उचलावे. अखंडित वीज पुरवठ्यासाठी बाभळेश्वर येथून पर्यायी वीज वाहिनी टाकावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी गर्दी नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला जाणार असल्याचे सांगत ते म्हणाले, शिर्डीच्या १५ किमी. आधीपासून मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये दिशादर्शक फलक लावण्यात येतील. वाहनतळाची माहिती देण्यासाठी डिजिटल स्क्रीन्स उभारणार असून, संपूर्ण परिसर * पान २ वर

# तब्बल ‘एवढे’ नवीन चेहरे पहिल्यांदाच करणार महापालिकेत प्रवेश; वाचा प्रभागनिहाय यादी

नाशिक प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीत १२२ जागांपैकी ७२ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये भाजपचा महापौर पाहायला मिळणार आहे. भाजप पाठोपाठ शिंदेंच्या सेनेला २६, ठाकरेंच्या शिवसेनेला १५, काँग्रेसला ०३, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ०४, मनसेला एक आणि अपक्ष उमेदवार एका जागेवर विजयी झाला आहे. यंदाची लढत अत्यंत लक्षवेधी ठरली असून, तपोवनाच्या मुद्द्यासह, भाजपमधील तिकीट वाटपाचा गोंधळ, ऐनवेळी नेत्यांचा झालेला पक्षप्रवेश, निष्ठावान उमेदवारांना नाकारलेली उमेदवारी आणि त्यांनी केलेली बंडखोरी यामुळे नाशिक चांगलेच चर्चेत आले होते. यंदाच्या निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेसह इतर पक्षांनी अनेक नवीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. यातील काहींना पराभवाचा सामना करावा लागला. तर काही जणांनी विजयश्री खेचून आणला. त्यामुळे आता जे उमेदवार निवडून आले ते महापालिकेत आपल्या प्रभागाचे प्रश्न मांडणार आहेत. यामध्ये जवळपास ६५ नवीन उमेदवार (उरपवळवरींश) निवडून आले असून, ते प्रथमच ‘राजीव गांधी भवन’ची पायरी चढणार आहेत. तर




अत्यंत चुरशीच्या लढाईत सुमारे ४५ जणांनी पुन्हा निवडून येण्याची किमया केली आहे.त्यामुळे काही नगरसेवक ‘ब्रेक के बाद’ पालिकेत प्रवेश करणार आहेत.

### निवडून आलेल्या नवीन उमेदवारांची यादी

प्रभाग क्रमांक ०१ - रूपाली नन्नावरे, दीपाली गीते, प्रवीण जाधव, प्रभाग क्रमांक ०२ - रिद्धेश निमसे, नामदेव शिंदे, ऐश्वर्या लाड, इंदूमती खेताडे, प्रभाग क्रमांक ०३ - जुई शिंदे, गौरव गौवर्धने, प्रभाग क्रमांक ०४ - मोनिका हिरे, सागर लामखेडे, प्रभाग क्रमांक ०५ - नीलम पाटील, चंद्रकला धुमाळ, प्रभाग क्रमांक ०६ - प्रमोद पालवे, बाळू काकड, रोहिणी पिंगळे, चित्रा तांदळे, प्रभाग क्रमांक ९ - अमोल पाटील, संगीता घोटेकर, भारती धिवरे, प्रभाग क्रमांक ८ - अंकिता शिंदे, कविता लोखंडे, प्रभाग क्रमांक १० - विश्वास नागरे, समाधान देवरे, प्रभाग क्रमांक ११ - मानसी शेवरे, सविता काळे, सोनाली भंदुरे आणि नितीन निगळ, प्रभाग क्रमांक १२ - सीमा ठाकरे, प्रभाग क्रमांक १३ - राहुल शेलार, अदिती पांडे, मयुरी पवार, प्रभाग क्रमांक १४ - समिया खान, नाझीया अत्तार, जागृती गांगुर्डे, प्रभाग क्रमांक १५ - सीमा पवार, प्रभाग क्रमांक १७ - प्रमिला मैंद, प्रभाग क्रमांक १८ - सुनिता भोजने, प्रभाग क्रमांक १९ - योगेश भोर, रुचिरा साळवे, प्रभाग क्रमांक २० - सतीश निकम, कैलास मुदलियार, प्रभाग क्रमांक २१ - जयंत जाचक, श्वेता भंडारी, प्रभाग क्रमांक २२ - वैशाली दाणी, संजीवनी हांडोरे, योगेश गाडेकर, प्रभाग क्रमांक २३ - संध्या कुलकर्णी, मंगला नन्नावरे, प्रभाग क्रमांक २४ - पल्लवी गणोरे, डॉ. पूनम महाले, प्रभाग क्रमांक २६ - निवृत्ती इंगोले, नयना जाधव, प्रभाग क्रमांक २७ - प्रियांका दोंदे, नितीन दातीर,किरण राजवाडे, प्रभाग क्रमांक २८ - शरद फडोळ, प्रभाग क्रमांक २९ - डॉ. योगिता हिरे, भूषण राणे, प्रभाग क्रमांक ३१ - माधुरी डेमसे , वैशाली दळवी, बाळकृष्ण शिरसाठ.

### या माजी नगरसेवकांचा पत्ता कट

दिनकर आढाव, मीराबाई हांडगे, संभाजी मोरूस्कर, * पान २ वर

दैनिक बोल नाशिक

रविवार, दि.१८ जानेवारी २०२६



## संपादकीय...

# रस्तेबांधणीचा नवा विक्रम

उच्च क्षमतेचे राष्ट्रीय जाळे उभारण्याच्या प्रयत्नांमुळे २०२५ मध्ये भारताच्या रस्ते पायाभूत सुविधांमध्ये सातत्यपूर्ण विस्तार नोंदवला गेला. पूर्वीच्या काळात, कनेक्टिव्हिटीसाठी ग्रामीण रस्ते, राज्य महामार्ग आणि दुपदरी मार्गांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यांच्यावर वाढत्या वाहतुकीच्या प्रमाणामुळे सतत ताण येत होता. गेल्या दशकातील दीर्घकालीन गुंतवणूक आणि प्रकल्प अंमलबजावणीमुळे मात्र या रचनेत बदल झाला. भारताचे रस्ते जाळे आता ६३ लाख किलोमीटरपेक्षा जास्त पसरले आहे. त्यामुळे ते जागतिक स्तरावर सर्वात मोठ्या जाळ्यांपैकी एक बनले आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्रणाली २०१३–१४ मधील सुमारे ९१ हजार २८७ किलोमीटरवरून मार्च २०२५ पर्यंत अंदाजे १ लाख ४६ हजार २०४ किलोमीटरपर्यंत विस्तारली आहे. ही वाढ सुमारे ६० टक्के आहे. या टप्प्यातील विकास केवळ जाळ्याच्या लांबीवरच नव्हे, तर लांब पल्ल्याचा प्रवास आणि मालवाहतुकीला आधार देण्यासाठी वेगवान कॉरिडॉर आणि द्रुतगती मार्गांवरही केंद्रित होता. २०२५ पर्यंत मोठ्या, बहुवर्षीय महामार्ग कार्यक्रमांनी जाळ्याच्या वाढीला आधार दिला. भारतमाला टप्पा–१ अंतर्गत, २६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी जवळपास १९ हजार आठशे किलोमीटरचे बांधकाम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. हे प्रकल्प आर्थिक कॉरिडॉर, बंदरे आणि सीमा जोडणारे मार्ग तसेच औद्योगिक क्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांपर्यंत पसरले आहेत. या कार्यक्रमांतर्गत ४.९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. तो विस्ताराच्या या टप्प्यातील भांडवली गुंतवणुकीची व्याप्ती अधोरेखित करतो. यासोबतच प्रवेश–नियंत्रित 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉरचा'ही वेगाने विस्तार झाला आहे. एक दशकापूर्वी १०० किलोमीटरपेक्षा कमी द्रुतगती मार्ग होते, त्याऐवजी आता भारतात प्रमुख शहरे आणि औद्योगिक केंद्रांना जोडणारे हजारो किलोमीटरचे वेगवान कॉरिडॉर आहेत. ते लांब पल्ल्याच्या रस्ते प्रवासात एक संरचनात्मक बदल दर्शवतात. २०२५ हे वर्ष संपले असताना, रस्ते आणि महामार्ग विकास भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा एक मुख्य आधारस्तंभ म्हणून उभा आहे. विखुरलेल्या मार्गांवरून एका समन्वित, उच्च–क्षमतेच्या जाळ्याकडे होणारे संक्रमण हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि देशभरातील दैनंदिन गतिशीलता सुधारण्यासाठी केलेल्या दीर्घकालीन प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. २०२५ हे वर्ष महामार्ग क्षेत्रासाठी एक पुनर्रचनेचे वर्ष ठरले. चालू आर्थिक वर्षात कंत्राट वाटप आणि बांधकामाच्या उद्दिष्टांवर थोडा परिणाम झाला. आणखी एक बदल म्हणजे व्यापक विचारविनिमयानंतर मालमत्ता मुद्रीकरण धोरणाला अंतिम रूप देण्यात आले. त्यामुळे प्रक्रिया सुलभ होईल आणि किरकोळ गुंतवणूकदारांना या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल. आतापर्यंत एकूण १४१० किलोमीटर लांबीच्या महामार्गांची कंत्राटे देण्यात आली आहेत, जी गेल्या आर्थिक वर्षातील एप्रिल–डिसेंबरमधील ३१०० किलोमीटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहेत. गेल्या दोन वर्षांपासून कंत्राट वाटपाचा वेग कमी होत आहे आणि या वर्षी ही घट अधिक तीव्र झाली आहे, कारण एप्रिलमध्ये रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने आपल्या रस्ते बांधकाम संस्थांना कामाला सुरुवात करण्यापूर्वी ९० टक्के 'राईट ऑफ वे' (आरओडब्ल्यू) ची उपलब्धता काटेकोरपणे सुनिश्चित करणे पूर्णपणे बंधनकारक केले आहे. या मंत्रालयाने कंत्राटवाटप करण्यापूर्वी वन आणि वन्यजीव मंजुरी तसेच रोड अंडर ब्रिज आणि रेल अंडर ब्रिजसाठी मंजूर 'जनरल अरेंजमेंट ऑफ ड्रॉइंग' (जीएडी) यांची अधिक कठोर तपासणी अनिवार्य केली आहे. पूर्वी तयारी पूर्ण होण्यापूर्वीच कंत्राट वाटप केल्यामुळे विलंब होत असे. सध्या ६४३ बांधकाम सुरू असलेले राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प हाती घेण्यात आले असून, त्यांची एकत्रित प्रकल्प किंमत सुमारे चार लाख कोटी रुपये आहे आणि २०१५–१६ पासून मंजूर झालेले प्रकल्प मूळ पूर्णत्वाच्या वेळापत्रकापेक्षा पुढे गेले आहेत. यापैकी ७९ प्रकल्पांना तीन वर्षांपेक्षा जास्त विलंब झाला. विश्लेषकांच्या मते, कंत्राट वाटपापूर्वी सर्व मंजुरी घ्यावी लागत असल्याने वाटपाचा वेग मंदावू शकतो; परंतु एकदा कंत्राट दिल्यानंतर प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने होईल. गेल्या आर्थिक वर्षात ७५३८ किलोमीटर लांबीच्या महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली होती आणि या वर्षीही हा आकडा गाठला जाऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. एप्रिल–नोव्हेंबर या कालावधीत एकूण सुमारे ४०७३ किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम झाले आहे. गेल्या वर्षी एप्रिल–डिसेंबर या कालावधीत हा आकडा ५८५३ किलोमीटर होता. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा भांडवली खर्च एप्रिल–ऑक्टोबरमध्ये १.७४ लाख कोटी रुपये होता. तो २०२५–२५ च्या याच कालावधीतील १.४४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकांमुळे मागील आर्थिक वर्षात भांडवली खर्च कमी राहिला होता. या वर्षासाठी महामार्ग बांधणीचे लक्ष्य दहा हजार किलोमीटर ठेवण्यात आले आहे, तर गेल्या आर्थिक वर्षात दहा हजार ६६० किलोमीटरचे लक्ष्य साध्य झाले होते. साधारणपणे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये बांधकाम आणि मंजुरीचा वेग वाढतो. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये रस्ते बांधणीचा वेग कमी होऊन ९,०००–९,५०० किलोमीटर (सुमारे २५–२६ किमी/दिवस) होईल, जो आर्थिक वर्ष २०२५ मधील १०,६६० किलोमीटरच्या बांधकामापेक्षा कमी आहे. मंत्रालयाने भूसंपादन आणि पर्यावरण मंजुरीच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या सहामाहीत मंजुरीच्या कामात वाढ होण्याची शक्यता आहे, असे 'आयसीआरए'चे म्हणणे आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारने भारतला प्रकल्पांतर्गत नवीन प्रकल्पांना मंजुरी देणे थांबवून 'ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस वे'वर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. सध्या देशभरात दहा हजार किलोमीटर लांबीच्या २५ ग्रीनफिल्ड एक्स्प्रेसवेवर ६ लाख कोटी रुपये खर्चाचे काम सुरू आहे. तिसऱ्या कार्यकाळात सरकारने १.९७ लाख कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यात ग्रामीण रस्ते आणि ९३६ किलोमीटर लांबीच्या आठ हाय–स्पीड रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. उच्च–गती द्रुतगती मार्ग भांडवल–केंद्रित असतात आणि त्यापैकी बहुतेक प्रकल्प खासगी क्षेत्राद्वारे 'बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर' (बीओटी) पद्धतीने कार्यान्वित केले जातील. प्रकल्प अधिक आकर्षक बनवण्यासाठी सवलत करारामध्ये आणखी बदल करण्यावर काम सुरू आहे. गेल्या आर्थिक वर्षात 'बोट' पद्धतीने ३०० किलोमीटर महामार्गांची कामे मंजूर करण्यात आली होती; परंतु या वर्षी या पद्धतीद्वारे महामार्गांच्या विकासासाठी कोणतेही प्रकल्प देण्यात आलेले नाहीत.

# प्रतिस्पर्धी उमेदवारांना मारहाण करत जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या पवन पवार समर्थकाला अटक

## पोलीस आयुक्तांकडे मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी

दैनिक बोल नाशिक

नाशिक प्रतिनिधी

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १८ मधून माजी नगरसेवक पवन पवार यांची मातोश्री आशा पवार शिवसेनेकडून उमेदवारी करत होत्या. त्यांच्या विरोधात भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक शरद मोरे व इतर राजकीय पक्षांचे तसेच अपक्ष उमेदवार निवडणूक लढवत होते. या निवडणुकीत भाजपाचे शरद मोरे यांचा विजयी झाला तर आशा पवार पराभूत झाल्या. यावेळी पवन पवार व विशाल पवार यांचे कार्यकर्ते विरोधी उमेदवारांना पराभवाला कारणीभूत ठरवत थेट अधिकृत पक्षाच्या उमेदवारांना धमकी देण्याची घटना घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रोहित गाडे या उमेदवाराला आरोपी विजय अशोक सिंग उर्फ शिंग्या याने सामनगाव पॉलीटेक्निक कॉलेज जवळ मतमोजणीच्या दिवशी रस्त्यात आडवत निवडणुकीत पवन पवार यांचा खूप खर्च झाला व ते इतका खर्च करूनही निवडणुकीत पराभूत झाले याची भरपाई म्हणून तीन लाख रुपयांची मागणी करण्यात आली व फिर्यादी रोहित गाडे यांना हातातील चाकूने छातीवर वार करण्याचा प्रयत्न देखील करण्यात आला असल्याची फिर्यादित नाशिक रोड पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. तर नवनिर्वाचित नगरसेवक शरद मोरे यांच्या निवासस्थानी देखील पवन पवार यांचे गुंड शुभेच्छा देण्याच्या पाहण्याने पोहोचले व शरद मोरे याला मारहाण केली यादरम्यान मारहाण करणारे संशयित यश गरुड व दीपक सदाकडे यांच्याकडे कमरेला पिस्तूल देखील लावल्याचे असल्याचे नगरसेवक मोरे यांनी पोलिसांना सांगितले. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मतदानाच्या आधीच शरद मोरे यांना अर्धांगवायूचा झटका देखील आलेला होता त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेमुळे पवन पवार यांच्या मातोश्रीच्या विरोधात उभे असलेले सर्वच उमेदवार भयभीत झाल्याचे बोलले जात आहे तसेच संशयीतांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी आयुक्तांकडे करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. निवडणूक जनसमर्थांवर लढवली गेली पाहिजे, दमदाटी, गुन्हेगारी व दडपशाही करून निवडणुका जिंकता येत नसतात. आपली प्रतिमा जन माणसांमध्ये चांगली असायला हवी गुंड प्रवृत्तीचे म्हणून आपली कधीही ओळख होता कामा नये तसे झाल्यास कुठल्याच निवडणुकीत जन समर्थन कधीही मिळणार नाही याचा विसर अलीकडे काही उमेदवारांना पडल्याचा दिसून येत आहे.

# या दोन बंधूंसाठी मनपाच्या निवडणुकीत'९' अंक ठरला भाग्यवान

दैनिक बोल नाशिक





नाशिक प्रतिनिधी

मानवी जीवनात अंकशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे मानले जाते आणि त्याचा प्रत्यय अनेक घडामोडींमधून येत असतो. नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ व १७ मधील दिवे बंधूंच्या निकालातून हाच अनुभव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. या दोन्ही प्रभागांतील निकालांकडे पाहता '९' हा अंक या निवडणुकीत दिवे बंधूंसाठी विशेष लाभदायक ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. यंदाच्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १६ मधून शिवसेनेच्या वतीने राहुल अशोक दिवे यांनी तर प्रभाग क्रमांक १७ मधून भाजपाकडून प्रशांत अशोक दिवे यांनी उमेदवारी केली होती. हे दोघेही नाशिक नगरीचे माजी महापौर अशोक दिवे यांचे सुपुत्र आहेत. विशेष म्हणजे वेगवेगळ्या राजकीय पक्षांतून निवडणूक लढवत असतानाही या दोन्ही भावांनी आपल्या–आपल्या पॅनलचे नेतृत्व समर्थपणे सांभाळले. राहुल दिवे यांनी प्रभाग १६ मध्ये आपल्या पॅनलसह प्रभावी प्रचार करत मतदारांचा भरघोस पाठिंबा मिळवला. त्यांच्या पॅनलमधील उमेदवारांना विजयापर्यंत नेण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि त्याचा सकारात्मक परिणाम निकालात दिसून आला. तर दुसरीकडे, प्रभाग १७ मध्ये प्रशांत दिवे यांनीही जोरदार लढत दिली. त्यांच्या पॅनलमधून मतदारांनी केवळ त्यांनाच प्रतिनिधित्वाची संधी दिली असली, तरी त्यांनी चांगल्या मताधिक्याने विजय मिळवत आपली लोकप्रियता सिद्ध केली. या दोन्ही निकालांकडे अंकशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता एक रंजक बाब समोर येते. प्रशांत दिवे यांना ९९९९ मते मिळाली, तर राहुल दिवे यांना तब्बल ९३०० मतदारांनी प्रतिनिधित्वाची संधी दिली. दोन्ही ठिकाणी '९' या अंकाची ठळक उपस्थिती दिसून येते. त्यामुळे या निवडणुकीत दिवे बंधूंना '९' या भाग्यांकाने प्रगतीपथावर नेले, अशी चर्चा सध्या जोर धरू लागली आहे. विजयाच्या आनंदासोबतच अंकशास्त्राचा हा योगायोग चर्चेचा विषय ठरत असून, प्रभाग १६ व १७ मधील निकालांमुळे दिवे बंधूंसाठी नऊ अंक ठरला भाग्यवान असेच चित्र सध्या नाशिक शहरात पाहायला मिळत आहे.

# साहित्य संमेलनामुळे लेखनासाठी बळ - ढिकले

दैनिक बोल नाशिक




नाशिकरोड, प्रतिनिधी

मी फार उशिरा साहित्य क्षेत्रात आलो. वयाने ज्येष्ठ असलो तरी सातारा साहित्य संमेलनात तरूणांसारखा कवी कट्ट्यावर कवितेत सहभाग नोंदविला. चांगल्या कविता मला या निमित्ताने ऐकता आल्या. साहित्य संमेलनात कविता सादर करण्याच्या अनुभवाने पुढील लेखनासाठी बळ दिले, असे प्रतिपादन लेखक तथा कवी तु. सी. ढिकले यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक रोड शाखेतर्फे सातारा – एक अनुभव हा कार्यक्रम नाशिक रोडच्या ऋतुरंग भवनमध्ये झाला. त्या वेळी ते बोलत होते. सातारा संमेलनातील निमंत्रित कवयित्री सविता पोतदार यांनी शाल, स्मृतिचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन त्यांचे स्वागत केले. सातारा संमेलनाला जाऊ न शकलेल्या साहित्य रसिकांना संमेलनाची कल्पना यावी म्हणून संमेलनात सहभागी झालेल्या नाशिककरांच्या अनुभवांचे कथन या वेळी करण्यात आले. कवी नंदकिशोर ठोंबरे म्हणाले की, माझे कविता सादरीकरण नव्हते. मात्र, अनेकांच्या चांगल्या कविता मला ऐकता आल्या. माजी न्यायाधीश वसंत पाटील यांनी सांगितले की, संमेलनाला छान प्रतिसाद लाभला. सांस्कृतिक कार्यक्रम व नाटकांचा छान आस्वाद घेता आला. सोमनाथ साखरे म्हणाले की, विश्वास पाटील संमेलनाध्यक्ष असताना मला कवी कट्ट्यावर संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. विश्वास टर्ले म्हणाले की, संमेलनामुळे माझ्या मित्र यादीत वाढ झाली, माणसातील माणुसकी अनुभवता आली. रतन पिंगट म्हणाले की, संमेलनात पुस्तक विक्री मोठ्या संख्येने झाली. भूपाल देशमुख म्हणाल की, सामान्य वारक–यासारखा निखळ आनंद मी अनुभवला. ॲड. संगीता पाटील म्हणाल्या की, परिसंवादांमुळे विचारांना एक वेगळी दिशा मिळाली. कवयत्री सविता पोतदार म्हणाल्या की, मसापच्या नाशिक रोड शाखेने मला सातारा येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पाठवून याची देही याची * पान ४ वर

प्रकाशक व मुद्रक कल्पेश मधुकर बिरारी यांनी मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे यांच्या वतीने हे पत्र कुलश्री प्रिंटर्स १, श्रीकुल अपार्टमेंट, गंगापूर रोड, पंपिंग स्टेशन, नासिक(महाराष्ट्र) ४२२०१३ येथे मुद्रित व ७८६, सुजाता बंगला, इंगळे नगर, जेलरोड, नाशिकरोड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी मालक, संपादक, प्रकाशक अगर मुद्रक सहमत असतीलच असे नाही. मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे व श्री. मायकल खरात संपादक (महाराष्ट्र) (पी. आर.बी. कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) मो.नं. ९३५९२६११९२ / ९१४५११०४४३, सर्व अधिकार सुरक्षित. PRGI No. MHBIL/25/-2129. Email- michaelkharat86gmail.com

# मालेगाव महापालिकेत घराणेशाहीचा दबदबा स्पष्ट

दैनिक बोल नाशिक

मालेगाव प्रतिनिधी

मालेगाव महापालिकेच्या निवडणुकीला लोकशाहीचा उत्सव म्हणावे की घराणेशाहीचा सोहळा असा सवाल पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. प्रत्येक निवडणुकीप्रमाणे याहीवेळी मालेगावात घराणेशाही आणि नात्यागोत्याच्या राजकारणाने प्रभाव दाखवून दिला आहे राजकीयदृष्ट्या प्रस्थापित असलेल्या एकेका कुटुंबांमधील एकाहून अधिक सदस्य, पती-पत्नी, काका-पुतणे, सासरे-सून, भाऊ-भाऊ, दिर-भावजय, माय-लेक अशा नातेसंबंधातील उमेदवारांनी निवडणूक जिंकत महापालिकेतील सत्तेच्या वर्तुळात आपली पकड घट्ट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. निवडणुकीचे वारे किती ही वेगाने वाहिले आणि राजकारणात कितीही उलथापालथ झाली, तरी मालेगावच्या मातीत घराणेशाहीची मुळे किती घट्ट आहेत, हे या निकालांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. माजी आमदार आसिफ शेख यांचे घराणे मालेगावात राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रस्थापित घराणे मानले जाते. शेख हे स्वतः माजी महापौर आहेत. त्यांचे पिताश्री दिवंगत माजी आमदार शेख रशीद यांनी अडीच वर्षे महापौरपदाची धुरा सांभाळली होती. आसिफ शेख यांच्या मातोश्री ताहेरा शेख या देखील माजी महापौर आहेत. शेख यांनी तीन वर्षांपूर्वी कॉँग्रेसला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये फूट पडल्यावर राजकीयदृष्ट्या स्थानिक पातळीवर अडचण झाल्यामुळे गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी मालेगावात इस्लाम पक्षाची स्थापना केली. या निवडणुकीत इस्लाम पक्षाचे ४७ उमेदवार



निवडणूक रिंगणात होते. त्यापैकी तब्बल ३५ उमेदवार विजयी झाले आहेत. इस्लाम पक्षातर्फे आसिफ शेख यांच्या मातोश्री ताहेरा शेख, काका जलील शेख, खालीद हाजी व इमरान शेख हे दोन भाऊ व भावजई नसरीन बानो अशा पाच जणांना निवडणूक रिंगणात उतरविण्यात आले होते. आश्चर्याची बाब म्हणजे या सर्व पाचही जणांनी विजयाची पताका फडकावली आहे.

**‘सर्वांना आवडे घराणेशाही’**

मालेगावात महापालिका निवडणुकीत घराणेशाहीचा बोलबाला हा प्रकार नवा नाही. यावेळी देखील जवळपास सर्वच प्रमुख पक्षांनी उमेदवारी देताना घराणेशाही व नात्यागोत्याला प्राधान्य दिले. इस्लाम पक्षाने समाजवादी पार्टीबरोबर युती करुन सेक्युलर फ्रंट या आघाडीच्या नावाने यंदाची निवडणूक लढवली. समाजवादी पार्टीतर्फे शान-ए- हिंद व त्यांचे पती मुस्तकिम डिग्निटी यांनी निवडणूक लढवली आणि हे पती-पत्नी त्यात विजयी झाले. शान या दिवंगत समाजवादी नेते निहाल अहमद यांच्या कन्या आहेत. कॉँग्रेसतर्फे महानगर प्रमुख एजाज बेग हे स्वतः तसेच त्यांची पत्नी यास्मिन बेग व भाऊ रियाज बेग असे तिघे एकाच प्रभागात लढले. त्यात एजाज बेग व पत्नी यास्मिन या विजयी झाल्या आहेत. त्यांचे भाऊ रियाज बेग यांना मात्र पराभव पत्करावा लागला. 'एमआयएम' चे आमदार मौलाना मुफ्ती मोहम्मद इस्माईल यांनी पुत्र अब्दुल्ला फैसल यास पहिल्यांदाच निवडणूक रिंगणात उतरविले. त्यात त्यांना यश आले आहे. याच पक्षाचे माजी महापौर अब्दुल मालिक, त्यांचे बंधू अब्दुल माजिद व डॉ.खालिद परवेज, भावजय, सून, बहिण, आतेभाऊ अशा एकाच कुटुंबातील तब्बल सात सदस्यांनी निवडणूक लढवली. त्यात अब्दुल मालिक व अन्य तीन सदस्यांनी यश मिळवले आहे.

**शिवसेना, भाजपही त्याच वाटेने**

शिवसेना शिंदे गट व भाजप या दोन्ही पक्षांनी देखील उमेदवारी देताना घराणेशाहीला प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबले. माजी उपमहापौर सखाराम घोडके हे आधी नगरपालिका व नंतर महापालिका अशी जवळपास ४० वर्षे नगरसेवक होते. या निवडणुकीत घोडके यांना विश्रांती देत त्यांच्याऐवजी पत्नी लताबाई घोडके यांना शिंदे गटातर्फे उमेदवारी देण्यात आली. घोडके यांचे जावई विनोद वाघ यांना देखील उमेदवारी देण्यात आली होती. त्यात सासू लताबाई घोडके यांना दणदणीत विजय मिळवता आला असला तरी, जावई विनोद वाघ यांना मात्र पराभव पत्करावा लागला आहे.

शिंदे गटातर्फे जिजाबाई पवार व विशाल पवार या माता पुत्रानेही निवडणूक लढवली. त्यात दोघेही विजयी झाले आहेत. भाजपचे महापालिकेतील माजी गटनेते सुनील गायकवाड, त्यांचा पुत्र दीपक व भाऊ मदन गायकवाड हे तिघे वेगवेगळ्या प्रभागात भाजपतर्फे लढले. त्यात मदन गायकवाड हे विजयी झाले तरी, स्वतः सुनील गायकवाड व पुत्र दीपक हे दोघे पराभूत झाले आहेत.

# शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांसाठी किसान सभेतर्फे बोरगावला रास्तारोको आंदोलन

## दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा जे. पी. गावित यांचा इशारा



दैनिक बोल नाशिक

बोरगाव प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेतर्फे राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि. १७) सुरगाणा तालुक्यातील वणी सापुतारा राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव येथे बिरसा मुंडा चौकात सुमारे दीड हजार आंदोलकांनी रास्ता रोको आंदोलन केले.

महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांच्या तहसील कार्यालयांसमोर होणाऱ्या या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे माजी राज्याध्यक्ष तथा शेतकरी नेते, माजी आमदार जे. पी. गावित यांनी केले. शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात शेतकऱ्यांच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या. पश्चिम वाहिनी नद्यांच्या उपनद्यांवर के. टी वेअर सिमेंट कॉँक्रिटसारखे आदर्श बंधारे बांधून स्थानिक शेतकरी तसेच खान्देश व मराठवाड्यातील शेतकरी, उद्योगधंदे व औद्योगिक वसाहतींना पाणी उपलब्ध करून द्यावे, अपूर्ण व गाळाने भरलेले बंधारे त्वरित पूर्ण करावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. वनाधिकार कायदा अंतर्गत आदिवासींच्या ताब्यात असलेली १० एकर हक्काची जमीन तत्काळ लाभधारकांना द्यावी, स्वतंत्र सातबारा तयार करून पती-पत्नीचे नाव कब्जेदार सदरी नोंदवावे, इतर हक्क सदरी वनविभाग अथवा शासनाचे नाव असावे, अशी मागणी करण्यात आली. वनपट्टा धारकांना मिळालेल्या जमिनीत विहीर, जमीन सपाटीकरण, फळबाग लागवड, सोलर व मोटर यासह केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा लाभ द्यावा, उर्वरित फॉरेस्ट प्लॉट प्रकरणे त्वरित निकाली काढावीत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा करावा या मागण्या करण्यात आल्या. आंदोलनात जनार्दन भोये, सावळीराम पवार, वसंत बागुल, पुंडलिक भोये, संदीप भोये, अशोक भोये, भगवान गांगुर्डे, भास्कर जाधव, अशोक धूम, नितीन गावित सहभागी झाले होते. पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मनोज कुंवर, उपनिरीक्षक खाडे व कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# ओतूर धरण कामाची आ.नितीन पवारांकडून पाहणी

## धरणाचे काम पूर्ण करण्याचे व पावसाळ्यात पाणी अडवण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन

दैनिक बोल नाशिक

कळवण । प्रतिनिधी

कळवण तालुक्यातील बहुचर्चित ओतूर धरणाच्या विशेष दुरुस्ती काम सध्या युद्ध पातळीवर सुरु असून या कामाची पाहणी आमदार नितीन पवार यांनी शुक्रवारी (१६ जानेवारी) केली. धरणाच्या सुरु असलेल्या कामाची माहिती जाणून घेत कामासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना केल्या. दरम्यान जून २०२६ अखेर पावसाळ्यापूर्वी ओतूर धरणाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करणार असून येत्या पावसाळ्यात धरणात पाणी अडविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

ओतूर धरणाच्या विशेष दुरुस्ती कामाला डिसेंबर २०२४ मध्ये सुरुवात झाली असून धरणाच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु असून आमदार नितीन पवार यांनी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता सह शेतकऱ्यांसमवेत धरणाच्या कामाची पाहणी केली. शेतकऱ्यांनी यावेळी उपस्थित केलेल्या प्रश्नांसंदर्भात अधिकाऱ्यांनी माहिती दिल्याने शेतकऱ्यांचे समाधान झाले.ओतूर धरणाच्या दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू असून पुढील ४/६ महिन्यात काम पूर्ण करण्याचे जलसंपदा विभागाचे प्रयत्न आहे. धरणाच्या दुरुस्तीनंतर धरणात ९१ दशलक्ष घनफूट पाणीसाठा होणार असून ओतूर परिसरातील ८/१० गावांना एकर क्षेत्र सिंचनाचा लाभ होणार आहे. सध्यास्थितीत धरणाच्या जलरोधी खंदकाचे काम पूर्ण झाले असून विमोचकाचे काम ९०% पूर्ण झाले आहे. धरणातील भुजल प्रवाह नियंत्रित करण्यासाठी कॉँक्रिट भिंतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सांडव्याच्या कॉँक्रिट स्लॅब व भिंतीचे तसेच धरणातील वॉलचे बांधकाम पूर्ण झाले आहे. विमोचकाचे काम ७०% पूर्ण झाले असून जुन्या धरणाला ज्या ठिकाणी नवीन धरण जोडले जाणार आहे. त्या ठिकाणचे खोदकाम प्रगतीत आहे. या सर्व कामांची आमदार नितीन पवार व शेतकऱ्यांनी पाहणी केली. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ढोकचौळे, उपविभागीय अभियंता देवीप्रसाद सोनवणे,कनिष्ठ अभियंता गजानन फटपुरे, ठेकेदार मंदार भापकर रविकांत सोनवणे, हरिभाऊ पगार, युवराज मोरे, रमेश दशपुते, हिरामण वाघ, निंबा देशमुख, दिपक आहेर, ज्ञानेश्वर पवार, नामदेव अहिरराव, दत्ता भोये, देवेंद्र मोरे, शांताराम मोरे अश्विन मोरे आदीसह शेतकरी उपस्थित होते.



“ ओतूर धरणाच्या कामाची माहिती आमदार नितीन पवार यांना देतांना जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ढोकचौळे, देवीप्रसाद सोनवणे, गजानन फटपुरे, राजेंद्र भामरे, मंदार भापकर रविकांत सोनवणे, हरिभाऊ पगार, युवराज मोरे,रमेश दशपुते, हिरामण वाघ, निंबा देशमुख

स्व. ए.टी.पवार यांनी ओतूर धरणाचे पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी माझे प्रयत्न होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओतूर धरणाचे काम मार्गी लावेल हा शब्द दिला होता.त्यांनी या कामासाठी निधी दिल्यामुळे या धरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे.काम बघून मनस्वी समाधान वाटते, या धरणामुळे परिसर विकासाला चालना मिळणार आहे.

– आमदार नितीन पवार
कळवण

**आमदार नितीन पवारांचा शब्द:-**

ओतूर धरण पूर्ण क्षमतेने दरवर्षी भरते. धरणाला गळती असल्याने मार्चअखेर धरण कोरडेठाक पडत होते. त्यामुळे या परिसरात उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवते. धरणाच्या दुरुस्तीची मागणी गेल्या ४५ वर्षांपासून होती. आमदार नितीन पवार यांनी विधानसभा निवडणुकीत धरणाचा प्रश्न मार्गी लावणारा असल्याचा शब्द या भागातील शेतकऱ्यांना दिला होता. धरणाच्या दुरुस्तीसाठी शासनस्तरावरुन ४५.३० कोटी रुपयांचा निधी मिळविण्यात यश मिळवून शब्द खरा करुन या कामाला गती दिली आहे.

पान १ वरून

## कुंभमेळ्यापूर्वी शिर्डीतील..

सीसीटीव्ही व पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीमने जोडला जाईल. प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष पथक व अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत. कुंभमेळ्यात मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी १४ नवीन टॉवर्स व ५ फिरते टॉवर्स उभारले जातील.

## तब्बल ‘एवढे’ नवीन...

अंबादास पगारे, सुनीता कोठुळे, शिवाजी गांगुर्डे, कल्पना चुंभळे, अरूण पवार, शिंदेसेनेचे पंडित आवारे, जयश्री खर्जुल, सूर्यकांत लवटे, ज्योती खोले, नयना गांगुर्डे, विष्णू बेंडकुळे, पल्लवी पाटील, सीमा निगळ, पूनम मोगरे, यांचा समावेश आहे. तर मनसेचे सलिम शेख, सुदाम कोंबडे यांना पराभवाचे धनी व्हावे लागले. कॉँग्रेसच्या वत्सला खैरे, राष्ट्रवादी (शरद पवार) गटाच्या समीना मेमन, भाजपच्या अर्चना थोरात, राष्ट्रवादी (अजित पवार)चे सतीश सोनवणे हे सुद्धा पराभूत झाले आहेत. अपक्ष रूची कुंभारकर, पूनम सोनवणे, शिंदेसेना पुरस्कृत अपक्ष अशोक मुर्तडक, इंदूमती खोसकर, मनीष बागुल यांनाही पराभवाचा सामना करावा लागला.

**महिला आरक्षण ५० टक्के, प्रतिनिधित्व मात्र ५५ टक्के**

महिलांसाठी ५० टक्के म्हणजे जागा राखीव असतानाही यंदा पालिकेत तब्बल ६७ महिलांचा प्रवेश झाल्याने खऱ्या अर्थाने महिलाराज येऊ घातले आहे. १२२ पैकी ६१ जागा महिलांसाठी राखीव होत्या. त्याव्यतिरिक्त आणखी सहा महिला निवडून आल्या आहेत. खुल्या जागांवर उभ्या राहिलेल्या या महिलांना पुरुषांपेक्षाही मतदारांनी अधिक पसंती दिल्याचे स्पष्ट आहे. महिलांचे राजकारणातील स्थान जनतेने अधिक प्रमाणात स्वीकारल्याचे यातून मानता येईल. प्रभाग १, प्रभाग ८, प्रभाग ११, प्रभाग १४, प्रभाग १६ आणि प्रभाग २३ मधील खुल्या जागांवर महिलांनी विजयाचा झेंडा फडकावला आहे.

# गुटखा बंदी कागदावर, काळा धंदा जमिनीवर : नाशिकमध्ये कायद्याचा बालेकिल्ला ढासळतोय का?

दैनिक बोल नाशिक

देविदास बैरागी/ निफाड

राज्यात गुटखा, सुगंधित तंबाखू, पानमसाला, सिगारेट आणि तत्सम घातक पदार्थांवर कडक बंदी आहे. असे सरकार दरवेळी ठासून सांगते. पण प्रत्यक्ष वास्तव पाहिले तर ही बंदी केवळ कागदावरच खिळून खितपत पडली आहे. जमिनीवर मात्र या बंदीला सर्रास हरताळ फासला जातो आहे, याचे विदारक चित्र नाशिक जिल्ह्यातून पुन्हा एकदा समोर आले आहे.

दिंडोरी तालुक्यातील तळेगाव येथे अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेली धडक कारवाई केवळ एका कारखान्याचा पर्दाफाश नाही, तर संपूर्ण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर, सजगतेवर आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी घटना आहे. रोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू, जर्दा आणि पानमसाला उत्पादन करणारा कारखाना थेट सुरू असणे, आणि तोही महिनोन् महिने कोणाच्या लक्षात न येणे हे सहजासहजी पचनी पडणारे नाही.वनाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक आणि नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक हे कडक, शिस्तप्रिय आणि कायद्याच्या चौकटीत काम करणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. मात्र तरीही या घटनेमुळे एक कटू सत्य समोर येते वरची पातळी कडक असली, तरी खालच्या पातळीवर कुठेतरी साखळी तुटलेली आहे का? कायद्याचा बालेकिल्ला मजबूत ठेवण्यासाठी केवळ आदेश पुरेसे नसतात, तर अंमलबजावणीतील प्रत्येक शिलेदार नितळ असावा लागतो.




हा कारखाना एखाद्या रात्रीतून अचानक उभा राहिला होता का? दिवस-रात्र सुरू असलेले उत्पादन, मोठ्या प्रमाणावर ये-जा करणारा कच्चा माल, रसायने, मजूर आणि वाहतूक हे सर्व अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असलेल्या पोलीस ठाण्याच्या नजरेतून कसे सुटले? स्थानिक गुन्हे शाखा आणि दिंडोरी पोलीस निरीक्षक यांच्या 'तीक्ष्ण नजरेतून' हे सगळे कसे निसटले, हा प्रश्न आज सामान्य नागरिक विचारत आहेत.

विशेष चिंताजनक बाब म्हणजे हे तळेगाव हे संबंधित मंत्री महोदयांच्या मतदारसंघात येते. त्यामुळे ही घटना केवळ योगायोग म्हणून झटकून टाकता येणार नाही. येथे संशयाची सुई व्यवस्थात्मक दुर्लक्षाकडे वळते. कुणाच्या सोयीसाठी डोळेझाक झाली का? कुठे मौनाची किंमत मोजली गेली का? या प्रश्नांची उत्तरे केवळ संशयाच्या पातळीवर राहू नयेत, तर तथ्यांच्या आधारे समोर यायला हवीत.

अन्न व औषध प्रशासनाने दाखवलेली धाडसाची भूमिका मात्र निश्चितच कौतुकास्पद आहे. कोणत्याही आमिषाला बळी न पडता, दबावाला न झुकता त्यांनी कारवाई केली आणि काळे कारनामे उघड केले. पण याच कारवाईमुळे पोलीस यंत्रणेचे अपयश अधिक ठळकपणे समोर आले आहे. एका यंत्रणेमुळे दुसरी यंत्रणा उघडी पडणे, हे लोकशाहीसाठी धोक्याचे लक्षण आहे. या प्रकरणात केवळ गुन्हा नोंदवून माल जप्त करणे पुरेसे ठरणार नाही. कारण हा कारखाना एकटा नाही; त्यामागे आर्थिक मांडवली, वाहतूक साखळी, कच्चा माल पुरवठा, संरक्षण देणारे घटक अशी एक संपूर्ण यंत्रणा कार्यरत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक नागरिकांकडून मिळणाऱ्या सूचक प्रतिक्रिया, पुरावे आहेत पण नाव छापू नका अशी भीतीदायक कबुली, हे वातावरण किती दहशतीचे आहे याचे द्योतक आहे. म्हणूनच या प्रकरणाची दखल राज्य सरकारने गांभीर्याने घेणे अत्यावश्यक आहे. चौकशी केवळ कागदोपत्री न राहता, स्वतंत्र आणि निष्पक्ष विशेष तपास पथक एस आय टी मार्फत या संपूर्ण साखळीचा छडा लावला गेला पाहिजे. कोण डोळेझाक करत होते, कोण मौन पाळत होते आणि या 'गोड गुळाच्या मलिद्यात' नेमके कोण सहभागी होते. याची खाते निहाय चौकशी झाली पाहिजे. आज नाशिक जिल्ह्यातील नागरिक संतप्त आहेत. कारण प्रश्न साधा आहे कायदा सर्वांसाठी समान आहे का? की काहींसाठी तो फक्त कागदावरच असतो? जर या प्रश्नाचे उत्तर ठोस कारवाईतून दिले गेले नाही, तर कायद्याचा बालेकिल्ला ढासळल्याशिवाय राहणार नाही.

## अभिनव सी.एड कॉलेजमध्ये वेशभूषा व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न



दैनिक बोल नाशिक

नाशिकरोड प्रतिनिधी

जेलरोड येथील स्व.गणेश द. धात्रक शिक्षण संस्था संचलित अभिनव सी. एड. कॉलेज, मॉन्टेसरी शिक्षिका प्रशिक्षण केंद्रामध्ये पारंपरिक वेशभूषा व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यावेळी संस्थेचे संस्थापक दत्तात्रय धात्रक, अभिनव बालविकास मंदिर व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री सरोदे, अभिनव सी.एड कॉलेजच्या विभाग प्रमुख विजया कोल्हे हे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते पाककला व वेशभूषा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. प्रशिक्षणार्थी शिक्षिकांनी विविध प्रांतातील वेशभूषा करुन सर्व समानता दर्शवली होती. तसेच विविध लहान मुलांना पौष्टिक आहार यावर विविध पदार्थ पाककला या स्पर्धेसाठी तयार केले होते तसेच नाविन्यपूर्ण डेकोरेट केले होते. याप्रसंगी प्रशिक्षणार्थी शिक्षिका सानिया खाटीक, दिपाली गाडेकर, मानसी काळे, अर्चना रहाडे, शैला खैरनार अश्विनी बोराडे, सुप्रिया शेलार, पुजा जाधव, दर्शना सुतार ,पुजा भालेराव या प्रशिक्षणार्थींनी स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.. सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षिकांनी आपले मनोगत व्यक्त करुन आपण परिपुर्ण शिक्षिका कसे तयार झालो .खरं तर अभिनव सी एड मधील अनुभव आम्हाला दिलेले ज्ञान आमच्या आयुष्यातील एक पर्व ठरेल. कायम आमच्या स्मरणात राहील असे विविध अनुभव सांगितले. यानंतर विजया कोल्हे, नलिनी गांगुर्डे यांनी मनोगत व्यक्त केले. दत्तात्रय धात्रक यांनी मार्गदर्शनात करताना म्हणाले की हे प्रशिक्षण नोकरी म्हणून नाही तर आपल्या पाल्याला चांगले संस्कार होण्यासाठी प्रत्येक मातेने करावे असे म्हणत त्यांच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्याप्रसंगी सुजाता जाधव, मंजुषा बागुल, वैशाली चव्हाणके, आरती डेरले, रेखा बोराडे उपस्थित होते.

## गंभीर आजारावर नाशिक, मुंबई येथील रुग्णालयात मोफत उपचारासाठी प्रयत्न करणार- आ.नितीन पवार

दैनिक बोल नाशिक



कळवण प्रतिनिधी

येथील शिबीरात तपासनी होऊन निदान झालेल्या गंभीर आजारांच्या उपचारासाठी नाशिक, मुंबई येथील रुग्णालयात मोफत उपचारासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन कळवण सुरगाणा तालुक्याचे आमदार नितीन पवार यांनी केले. या शिबिरात एकूण १ हजार २४५ गरजुनी लाभ घेतला. उपजिल्हा रुग्णालय कळवण, एसएमबीटी, नाशिक, कळवण तालुका प्राथमिक आरोग्य केंद्र, ए टी पवार इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कळवण उपजिल्हा रुग्णालय येथे आमदार नितीन पवार यांच्या संकल्पनेतून विनामूल्य आरोग्य तपासणी व उपचार शिबीर व दिव्यांग व्यक्तींना दाखले वाटप व तपासणी शिबिर घेण्यात आले. त्याप्रसंगी आमदार नितीन पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिक्षक डॉ संदिप सुर्यवंशी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष कौतिक पगार, ए टि पवार कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती धनंजय पवार, रुग्ण कल्याण समिती सदस्य उमेश सोनवणे, सहाय्यक गटविकास अधिकारी वंदना सोनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, रायुकॉ तालुकाध्यक्ष कुंदन हिरे, नगरसेवक राहुल पगार, बाळासाहेब जाधव, उपस्थित होते. पुढे बोलतांना आमदार पवार म्हणाले की, आदिवासी भागातील गोर गरीब रुग्णांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध होत नाही. त्यांना खासगी रुणालयात उपचारासाठी मोठी रक्कम मोजावी लागते. त्यामुळे गरीब जनतेने या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राजेंद्र भामरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ हेमंत पवार यानी केले.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती विजय शिरसाठ, हरीभाऊ पगार, शशिकांत बागुल, प्रकाश आहेर, डॉ. कमलाकर जाधव, डॉ. परशराम भोये, डॉ. नितीन गोडबोले, डॉ. पंकज जाधव, डॉ किशोर देशमुख, डॉ. झनक पुरकर राजेंद्र पाटील, आदींसह गरजु रुण मोठ्या संखेने उपस्थित होते.

या शिबिरात अजय रामदास आहेर, बापु राजाराम पाटील, पिंटू मोतीराम माळी, वाळु लहाणु भोये, अंजना गणेश जाधव, श्रीमती वत्सलाबाई विठ्ठल पवार, श्रीमती अर्चना धना अहिरे आदिना प्राथमिक स्वरूपात वाटप करण्यात आले.

या शिबिरात ह्रदयरोग, कान नाक घसा, नेत्ररोग, दंतरोग, स्त्रीरोग, बालरोग, तपासणी सह रक्त तपासणी, साखर तपासणी, ईसीजी, एक्सरे, सीटी स्कॅन मोफत करण्यात आले.

या शिबिरात २ हजार ३१२ रुग्णाची नोंद झाली असून वेगवेगळ्या तपासणीचा १ हजार २४५ रुग्णांनी लाभ घेतला.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवर घ्या - काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची मागणी

दैनिक बोल नाशिक

मुंबई - देशातील अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर (बॅलेट पेपर) घेण्याचा निर्णय घेतला आहे. मग महाराष्ट्रातच ईव्हीएमचा हट्ट का आणि कोणाच्या फायद्यासाठी? असे प्रश्न मतदार विचारत आहेत. त्यामुळे या जनभावनेचा आदर करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



पटोले यांनी यासंदर्भात राज्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी पत्र पाठवले आहे. राज्यात नुकत्याच झालेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकांनी निवडणूक व्यवस्थेचा बुरखा पूर्णतः फाडला आहे. शहरातील अत्यल्प मतदानाची टक्केवारी ही केवळ मतदार उदासीन नसून निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे निर्देशक असल्याचे पटोले यांनी पत्रात म्हटले आहे.

मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांना दोन-तीन तास करावी लागणारी वणवण, हजारो मतदारांना मतदान न करताच परत जाण्याची येणारी वेळ, या साऱ्या बाबी निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेचे गंभीर निर्दशक असून ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. अत्यंत गंभीर बाब म्हणजे पालिका निवडणुकीत व्हीव्हीपॅट प्रणालीचा वापर करण्यात आला नाही. त्यामुळे आपल्या मतदानाची खात्री करण्याचा मतदाराचा अधिकारच हिरावून घेण्यात आला. त्यात भर म्हणजे मतदारांच्या बोटाला लावलेली शाई हात धुतल्यानंतर पुसली जात होती. या साऱ्या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि आयोगाची निष्पक्षता यावर गंभीर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहेत, असे पटोले यांनी पत्रात नमूद केले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लोकशाहीच्या कणा आहेत. या निवडणुकीबाबत जर संशय, अविश्वास आणि गैरव्यवस्थेचे वातावरण राहिले तर ते लोकशाहीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे आहे. त्यामुळे जनभावनेचा विचार करून या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी पटोले यांनी पत्रात केली आहे.

पान २ वरून

### साहित्य संमेलनामुळे..

डोळा स्वर्गसुखाचा अनुभव दिला. वृंदा देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कोषाध्यक्ष ॲड. सुदाम सातभाई यांनी स्वागत, रेखा पाटील यांनी प्रास्ताविक केले. रामचंद्र शिंदे, प्रशांत केंदळे, अर्जुन वेलजाळी, गणपतराव मुठाळ, सुजाता येवले, मिलिंद गांधी, दिनेश पैठणकर, ॲड. संगीता पाटील आदी उपस्थित होते.